# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ७४ वी बैठक दिनांक २६ एप्रिल २०१३

## कार्यवृत्तांत व ठराव

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ७४ वी बैठक दि. २६ एप्रिल २०१३ रोजी मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) यांचे मंत्रालयीन दालन (दालन क्रमांक २४१ विस्तार), मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | मा. श्री. वल्लभ बेनके | ... | वि.स.स. व उपाध्यक्ष (मकृखोविम) |
| ३. | इं. शि. मा. उपासे | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

विशेष निमंत्रित

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. आनंदराव पाटील | ... | मा. उपाध्यक्ष |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. चं. आ. बिराजदार | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| २. | इं. अविनाश सुर्वे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| ३. | इं. राजन शहा | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (महामंडळ) अ.का. |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **(इंजि. शि. मा. उपासे)** | **(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)** |
| **कार्यकारी संचालक** | **मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)** |
| **म.कृ.खो.वि.म, पुणे** | **व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे** |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७४ वी बैठक दिनांक २६ एप्रिल २०१३

## ठराव

**ठराव क्रमांक ७४/१**

**"नियामक मंडळाच्या ७२ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही"**

**ठराव क्रमांक ७४/२**

**"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ७३ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव कायम करण्यात येत आहेत"**

**ठराव क्रमांक ७४/३**

**"ठराव करण्यात येतो की, कामाच्या अंदाजपत्रकामध्ये व निविदेच्या परिशिष्ट "ब" मध्ये भाववाढ रकमेची स्वतंत्र बाब म्हणून अंतर्भूत करणे, तसेच प्रकल्पांच्या सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालात काम पूर्ण करण्याचा कालावधी विचारात घेऊन भाववाढीचा अंतर्भाव करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.**

**(१) भाववाढीची तरतूद करतांना ती कामाच्या कालावधीनुसार खालीलप्रमाणे करावी.**

| कामाचा कालावधी | अंदाजपत्रकीय रकमेवर अंदाजीत भाववाढीची टक्केवारी |
|---|---|
| १ वर्षापर्यंत | १०%( दरवर्षी १०% गृहित धरुन ) |
| १ ते २ वर्षे | १५% ( दरवर्षी ५०% काम होईल असे गृहीत धरुन, पहिल्या वर्षीच्या ५०% कामावर १०% + दुस-या वर्षीच्या ५०% कामावर २०% ) |
| २ ते ३ वर्षे | २०% (दरवर्षी ३३% काम होईल असे गृहीत धरुन, पहिल्या वर्षीच्या ३३% कामावर १०% + दुस-या वर्षीच्या ३३% कामावर २०% + तिस-या वर्षीच्या ३३% कामावर ३०% ) |
| *टिप : निविदा कालावधी ३ वर्षापेक्षा जास्त असल्यास वरील सुत्राप्रमाणे भाववाढीची टक्केवारी परिगणीत करावी.* | |

"मान्य"

सही/-
(इंजि. शि. मा. उपासे)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

सही/-
(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ७४ वी बैठक दिनांक २६ एप्रिल २०१३

(२) निविदेच्या शेड्यूल "ब" मध्ये मंजूर अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार भाववाढीची स्वतंत्र बाब अंतर्भूत करावी. मात्र त्याकरीता कंत्राटदाराने निविदा भरतांना नमूद केलेली कमी अथवा जादा टक्केवारी लागू राहणार नाही.

(३) निविदेच्या शेड्यूल "ब" मध्ये अंतर्भूत केलेली भाववाढ रक्कम भाववाढीच्या विशेष शर्तीमधील सुत्रानुसार अदा केली जाईल. सदरची रक्कम राष्ट्रीय महागाई निर्देशांकानुसार कमी अथवा जास्त असू शकेल. त्यानुसार निविदेच्या विनिर्दिष्ट्ये मध्ये (Specifications) तरतूद करण्याची जबाबदारी सक्षम अधिका-यांची राहील.

ठराव क्रमांक ७४/४

"ठराव करण्यांत येतो की, जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे पत्र क्र. कार्या-३/३-क/ कावि./२४९, दि. ३/४/२०१३ अन्वये मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर येथील पाटबंधारे वसाहतीमधील ७२०० चौ. फु. जागा भविष्यात लागणार नसल्याने सदरच्या जागेचे शासकीय दराने होणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे कायमस्वरुपी वर्ग करणेबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

ठराव क्रमांक ७४/५

"ठराव करण्यात येतो की, जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे पत्र क्र. कार्या-३/३-क/कावि/ २७६/२०१३ दिनांक ९/४/२०१३ अन्वये मौजे हिप्परगा (एकरुख) येथील मौजे हिप्परगा (एकरुख) मध्यम प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेली गट नं. ७० मधील ७८ आर जमिन भविष्यात लागणार नसल्याने सदरच्या जमीनीची शासकीय दराने होणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे कायमस्वरुपी वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

ठराव क्रमांक ७४/६

"भामा आसखेड प्रकल्पाच्या नियोजित लाभक्षेत्रामध्ये वेगाने होणारे नागरीकरण व त्यामुळे वाढलेल्या बिगर सिंचन पाणी वापराच्या मागण्या विचारात घेऊन पुणे म.न.पा. व औद्योगिक वसाहतींना आरक्षित केलेले बिगर सिंचनाचे पाणी, तसेच नागरीकरणामुळे लाभक्षेत्रातून जमीनी वगळण्याच्या व कालवा रद्द करणे या शेतकरी व लोकप्रतिनिधींच्या मागण्या विचारात घेऊन तसेच प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन प्रथम प्राधान्याने पुर्ण करणे याचा विचार करुन

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७४ वी बैठक दिनांक २६ एप्रिल २०१३

खालीलप्रमाणे प्रस्ताव महसूल विभागामार्फत शासनाचे मदत व पुनर्वसन विभागास सादर करण्याबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात आली.

१) भामा आसखेड प्रकल्पांतर्गत उजव्या कालव्याच्या एकुण १०५ कि.मी. पैकी दौंड तालुक्यातील कि.मी.९३ ते १०५ मधील एकुण ९ गावांपैकी ८ गावांनी "कालवा नको"असे ग्रामसभेचे ठराव दिले आहेत. त्यामुळे दौंड तालुक्यातील संपूर्ण ७४३५ हे. क्षेत्र वगळणे.

२) भामा आसखेड उजवा कालवा कि.मी. ६१ ते ९३ हवेली तालुक्यातील १६ गावापैकी १५ गावांनी 'कालवा नको' असे ग्रामसभेचे ठराव दिले आहेत. त्यामुळे हवेली तालुक्यातील संपूर्ण ६५८७ हे. क्षेत्र वगळणे.

३) कुरुळी उप शाखा कालव्यावरील गावांनी कालवा नको असे ग्रामसभेचे ठराव दिलेले आहेत. त्यामुळे या भागातील २६५०.२७ हे. क्षेत्र वगळणे.

४) खेड तालुक्यातील मेदनकरवाडीच्या ग्रामसभेने कालवा नको असा ठराव दिलेला आहे, त्यामुळे या भागातील १३६.६८ हे. क्षेत्र वगळणे.

५) खेड तालुक्यातील डाव्या कालव्यावरील मा.आमदार श्री.दिलीप मोहिते पाटील यांनी डावा कालवा नको अशी मागणी केली आहे. त्यामुळे या भागातील १२५५.०० हे. क्षेत्र ग्रामसभेचे ठराव प्राप्त करुन घेऊन वगळणे.

६) हवेली तालुक्यातील लोणीकंद व दौंड तालुक्यातील राहू या गावातील लाभक्षेत्र वगळण्याबाबत ग्रामसभेचे ठराव प्राप्त झालेले नाहीत. लोणीकंद व राहू ही दोन गावे कि.मी. ६१ ते १०५ मधील असल्याने या गावातील कालव्याद्वारे सिंचन करणे आर्थिक व तांत्रिकदृष्टया किफायतशीर नसल्याने या दोन गावांचेही लाभक्षेत्र वगळणे.

७) पुणे शहर व चाकण औद्योगिक वसाहत व लगतची १९ गावे यांना एकूण ८०.६९६ दलघमी. पाण्याची मागणी शासनाने / मुख्य अभियंता यांनी मंजूर केलेली असल्यामुळे सिंचन क्षेत्रात १०१७६ हे. कपात होत आहे. त्यामुळे या क्षेत्रास सिंचनासाठी भविष्यात पाणी देता येणे शक्य होणार नाही. त्यामुळे हे क्षेत्र प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातून वगळणे क्रमप्राप्त झाले आहे. परिणामी या क्षेत्रामध्ये प्रकल्पग्रस्तांचे नियोजित पुनर्वसन करता येणार नाही. प्रकल्पाच्या नियोजित लाभक्षेत्राचे पाणी पुणे महानगरपालिका व औद्योगिकरणासाठी वळविले असल्याने भामा आसखेड धरणाच्या पुनर्वसनाचा प्रश्न जलसंपदा विभागास / महामंडळास सोडविणे शक्य होणार नाही. त्यामुळे पुनर्वसनाचा प्रश्न एकतर पुणे महानगर पालिका व आद्यौगिक विकास महामंडळाने सोडवावा किंवा भामा आसखेड धरणाच्या पुनर्वसनाबाबत शासन स्तरावरुन विशेष पॅकेज देण्यात

"मान्य"

सही/-
(इंजि. शि. मा. उपासे)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

सही/-
(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ७४ वी बैठक दिनांक २६ एप्रिल २०१३

**यावे. भामा आसखेड धरणाच्या पुनर्वसनाचा प्रश्न गुंतागुंतीचा होणेची शक्यता आहे. याबाबत महसूल व पुनर्वसन विभागाने भामा आसखेड धरणाचे लाभक्षेत्र वगळण्याबरोबरच पुनर्वसनाचा प्रश्न सोडविण्याबाबत सर्वमान्य पर्यायासह प्रस्ताव शासनास सादर करावा.**

**८) भामा आसखेड प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातून गावे वगळण्याबाबत ग्रामसभेचे ठराव ग्रामपंचायतीने सादर केल्यामुळे लाभक्षेत्रातून वगळण्यात यावयाच्या क्षेत्राचा भामा आसखेड प्रकल्पाच्या पाण्यावर कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.**

**९) ठरावा नुसार भामा आसखेड प्रकल्पाचे प्रकल्पीय सिंचन क्षेत्र ४२४६.०५ हे. इतके सिमीत होईल व त्यासाठी फक्त उजवा कालवा कि.मी.१ ते ६१ नियोजित राहील.”**

**ठराव क्रमांक ७४/७**

**“नियामक मंडळाच्या बैठकीत सदर विषय अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही.”**

तद्‌नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष,मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**“मान्य”**

**सही/-**
**(इंजि. शि. मा. उपासे)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**सही/-**
**(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**